
मूल्य ३० रु./पृष्ठे १०४ । एप्रिल २०१८ । वर्ष ११ वे/अंक ४

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



॥उपनिषदांची विश्वात्मकता॥

चित्रकार वासुदेव कामत यांची चित्रे





# हल्लाबोल

सरकार नाही भानावर
राष्ट्रवादी उतरली रस्त्यावर...

## सत्ता परिवर्तन एकमेव विचार



# शेतीचा सुसंवाद नवीन

**जळगाव येथील जैन इरिगेशन सिस्टिम्स लि.च्या वतीने सूक्ष्म सिंचनाच्या क्षेत्रात प्रसार व प्रचाराचे काम करणाऱ्या व्यक्तीला डॉ. अप्पासाहेब पवार सूक्ष्मसिंचन पुरस्कार देऊन गेल्या १८ वर्षांपासून गौरविण्यात येत आहे. यावर्षीचा हा पुरस्कार चांदवडचे श्री. अविनाश मनोहर पाटोळे यांना श्री. शरद पवार व श्री. चंद्रकांत पाटील व ना. श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. त्या समारंभात श्री. शरद पवार यांनी केलेले भाषण.**

जवळपास दरवर्षी आपण याठिकाणी हा सोहळा करत असतो. भंवरलालजी असताना या कामाची सुरूवात झाली आणि बहुतेक वेळेला या कार्यक्रमाला माझी उपस्थिती ही कायम असते. यापूर्वीचे सगळे कार्यक्रम याठिकाणी व्हायचे, त्याच्यामध्ये भर टाकण्याची कामगिरी नव्या पिढीने केली, याचा मला आनंद आहे. पण एका गोष्टीच्या संबंधाची अस्वस्थता आहे, की जळगावला आल्याच्यानंतर जैन हिल्सला गेल्याच्यानंतर भवरलालजीसोबत सुसंवाद करण्याची संधी मिळत नाही. त्यामुळं माझ्या मनामध्ये एक प्रकारची अस्वस्थता आहे. गेली अनेक वर्षे आमचा स्नेह होता, समान विषयाच्या संबंधाची आस्था आम्हा उभयतांच्यामध्ये होती आणि त्यामुळे साहजिकच या विषयांच्यासंबंधी सुसंवाद करावा, चर्चा करावी याची संधी आम्ही दोघं एकमेकांनी घेतल्याशिवाय राहात नसत.

दिल्लीमध्ये ते आले तर हक्काने ते माझ्याकडे असायचे. आणि गेल्या काही वर्षांमध्ये मी जळगावला आल्याच्यानंतर जैन हिल्सवरती भवरलालजींच्यासमवेत राहिलेलो आहे. शेतीची चर्चा



# हायटेक तंत्राशी हवा

## शरद पवार

व्हायची, अर्थव्यवस्थेची चर्चा व्हायची. शिक्षणाची चर्चा व्हायची. शेतकऱ्याचं जीवनमान सुधारण्यासाठी काय करायचं याची चर्चा व्हायची. कधी कधी वादही व्हायचे. पण त्या वादाच्या पाठीमागं शेतकरी आणि बळिराजाच्या हिताची जपणूक करण्यासंबंधीचं जे मार्ग आहेत, कदाचित त्या संबंधीची भिन्नता असायची आणि त्यामुळं वाद असले, वाद झाले तरी मनातला ओलावा हा कधी कमी झाला नाही, हे त्याचं वैशिष्ट्य होतं.

मला कुणीतरी विचारलं, की भवरलालजींच्याबद्दल तुम्हाला काय वाटतं? एका खेड्यातनं आलेला गृहस्थ, अतिशय लहान व्यवसाय, पण दृष्टी खूप होती आणि त्यामधून कर्तृत्व दाखवण्यासंबंधीची स्वकष्टाने संधी स्वत: घेतली आणि त्या कर्तृत्वानं कर्तृत्वाचा महाडोंगर उभा करण्याच्यासाठी ते यशस्वी झाले हे भवरलालजींचं वैशिष्ट्य होतं.

एके दिवशी एका बैठकीमध्ये माझ्याबरोबर एक-दोन पत्रकार होते आणि त्याच्यात त्यांनी माझ्याशी फार वाद केला काही प्रश्नाच्यावरती. बैठक संपली. भवरलालजी कुठेतरी जाणार होते, ते गेले आणि त्या पत्रकारांनी विचारलं, की हे गृहस्थ तुम्हाला कसे वाटतात. तुमच्याशी तर भांडत होते. मी त्यांना सांगितलं, की भवरलाल मला फणसासारखे वाटतात. फणस हा बाहेरून ओबडधोबड असतो, पण तो उघडल्याच्यानंतर त्यातील गरे हे अत्यंत स्वादिष्ट असतात. भवरलाल हे एखाद्या प्रश्नाच्यासाठी धोरण आपलं योग्य नाही असं त्यांना वाटलं तर स्पष्टपणानं बोलतील. पण त्यांच्या अंत:करणात असलेला प्रेमाचा ओलावा यत्किंचीतही कमी नसतो. तो झरा कधी आटत नाही आणि हा माझ्या आयुष्यभरातला त्यांच्याबद्दलचा संबंध आहे. आणि म्हणून आज याठिकाणी येताना भवरलालजींचं स्मरण आपल्याला होणं साहजिकच आहे आणि याच्यामध्ये काही आश्चर्य नाही.

आजचा हा पुरस्कार अप्पासाहेबांच्या नावाने दिला. अप्पासाहेब पवार हे माझे वडीलबंधू होते. पण त्यांची आस्था आणि बांधिलकी ही शिक्षणाच्यामध्ये होती. शेतीच्याबद्दलची होती. ते शेतीविषयक पदवीधर होते. सहकारामध्ये काम केलं. यशस्वीरितीनं कारखानदारी उभी करून चालवली आणि या




जैन इरिगेशनने नव्याने उभारलेल्या मसाला फॅक्टरीचे शरद पवार उद्घाटन करताना शेजारी मंत्री बबनराव लोणीकर, पांडुरंग फुंडकर, सुरेशदादा जैन, चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, एकनाथ खडसे, अशोक जैन, गुलाबराव पाटील, गिरीश महाजन, हरिभाऊ जावळे व महापौर ललित कोल्हे


सगळ्या कारखानदारी चालवण्याच्यासंबंधीचा विचार एकदा त्यांनी डोक्यातून काढल्याच्यानंतर फक्त दोनच विषय लक्षामध्ये घेतले. एक, शेतकऱ्याचं जीवनमान सुधारण्याच्यासाठी आधुनिकतेचा प्रसार हा कसा करता येईल, नव्या पिढीला प्रोत्साहित कसं करता येईल आणि दुसरं, मुलींच्या शिक्षणाच्यासाठी काय करता आलं तर ते केलं पाहिजे. आणि म्हणून त्यांचा श्वास चालू असेपर्यंत या दोन गोष्टींच्यासाठी त्यांनी अतिशय कष्ट करण्याच्यासंबंधीची भूमिका घेतली. भवरलालजींशीही त्यांचे संबंध अतिशय मैत्रीचे होते आणि मला आनंद आहे, की जैन परिवारानं पुरस्कार देताना अप्पासाहेबांना जी दृष्टी होती, त्यांनी कष्ट केले, नव्या पिढीला शेतकऱ्यांच्यामध्ये प्रोत्साहित करण्याची त्यांची नीती होती, नेमका तोच विचार घेऊन त्याच दृष्टीनं काम करणारा कुणी तरूण शेतकरी असेल तर त्याचा सन्मान करण्याची भूमिका या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेतली.



जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन हे खादीचा सुती हार घालून शरद पवार यांचे स्वागत करताना।

मला आनंद आहे, आज चांदवडसारखा तालुका की जो दुष्काळी तालुका म्हणून ओळखला जातो, सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न चांदवडचा काय आहे तर पाणी आणि अखंडपणानं पाण्याचा विचार करणारा, पाणी नसल्यामुळं यातना सहन करणारा असा हा शेतकऱ्यांचा चांदवडसारखा परिसर आहे. मला आनंद आहे, की त्या परिसरातून शेतीच्या क्षेत्रामध्ये उत्तम काम केल्याच्यासंबंधी आज याठिकाणी अविनाश पाटोळे आणि त्यांच्या पत्नी यांचा सन्मान होतोय. नेमकं जे अभिप्रेत अप्पासाहेबांना होतं, जे अभिप्रेत याठिकाणी भंवरलालजींना होतं आज त्याची अंमलबजावणी पुढची पिढी करतेय याचा मला स्वत:ला आनंद आहे.

आज शेती आणि शेतीची अर्थव्यवस्था अडचणीची



अतुल जैन हे मैनी गाडीतून मसाल्याचा प्लॅन्ट शरद पवार यांना दाखविताना, शेजारी अनिल जैन व सुनील देशपां डे

आहे असं माझ्यासारख्याला वाटतं. काही रोगराईचं संकट आलं. खानदेशात एकेकाळी कापसाचं महत्त्वाचं पीक, विदर्भ-मराठवाड्यामध्ये कापसाचं महत्त्वाचं पीक. पण आपण बघतोय, गेली दोन-तीन वर्षे आणि यंदाच्या वर्षी अती झालं. बोंडअळीचा प्रादुर्भाव झाला आणि त्या बोंडअळीनी संबंध कापसाचं बोंड प्रत्यक्षपणानं बोंड तयार झाल्याच्यानंतर कापूस तयार होण्याच्या प्रक्रियेच्या काळात ती अळी बोंड उद्ध्वस्त करून टाकते आणि त्याच्यामुळं उत्पादकता घटलेली आहे. शेतकरी हा फार मोठ्या संकटामध्ये आलेला आहे.

आज बोंडअळीचं संकट आलं. अशी अनेक वेगवेगळ्या प्रकारची संकटं आहेत. मध्यंतरी हरियाना आणि पंजाबमध्ये अशाच काही शेतीच्या कामासंदर्भात मी फिरत होतो. माझं नेहमी पीकाकडं लक्ष असतं आणि एका ठिकाणी मी बघितलं, की गव्हाच्या पिकावरती त्याठिकाणी तांबेरा, ज्याला इंग्रजीमध्ये रस्ट म्हणतात तो रोग आलेला पाहिला. मी गाडी थांबवली आणि त्या शेतामध्ये गेलो आणि बघितलं तर तांबेरा त्याठिकाणी आलेला होता.

परत आल्याच्यानंतर शेती खात्यातल्या सगळ्या तज्ज्ञांना बोलावलं आणि त्यांना सांगितलं, की मला त्याठिकाणी तांबेरा दिसतोय. त्याला वेळीच आवर घातला नाही तर त्या तांबेऱ्यानी संबंध गव्हाचं पीक उद्ध्वस्त झाल्याशिवाय राहाणार नाही. जगात काही देशांमध्ये हे झालेलं आहे. आणि तो रोग कुठून तरी बाहेरून आलेला आहे. माझ्या कानावर अलिकडं आलेलं आहे, की केळीमध्येसुद्धा असाच एक कुठूनतरी बाहेरून करपा नावाचा रोग आलेला आहे. त्याचे जे कुणी तज्ज्ञ आहेत, त्याचा त्यांनी सखोल अभ्यास करावा. कारण शेतीला आणि शेतकऱ्याला दोन पैसे देणारं महत्त्वाचं पीक हे केळीचं आहे आणि म्हणून आज त्याला काही अडचण नाही. पण कदाचित उद्याच्याला अडचण




जैन इरिगेशनचे व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन हे कृषीमंत्री पांडुरंग फुंडकर यांचा सत्कार करतान ा



**अविनाश पाटोळे यांच्या पत्नी सौ. रश्मी यांचा साडीचोळी व चां दीचा नारळ देऊन सत्कार करताना सौ. ज्योतीभाभी अशोक जैन .**

निर्माण होऊ शकते. पण ही जी संकटं येतात, त्या संकटातून बाहेर काढण्याच्यासाठी सातत्यानं लक्ष देण्याच्यासंबंधीची गरज आहे आणि जैन इरिगेशनचं वैशिष्ट्य याठिकाणी आहे, की पाण्याच्या प्रश्नावर जसं त्यांनी लक्ष केंद्रीत केलं, आपल्या व्यवसायाचा विस्तार करायला जसं त्यांनी लक्ष दिलं, तसं शेतीच्यासंबंधी संशोधन करण्याच्या कामावरसुद्धा तितकंच महत्त्व देऊन लक्ष केंद्रीत करण्याच्यासंबंधीची भूमिका घेतली आणि त्याचा परिणाम आज नवीन नवीन जाती आणि पद्धती याठिकाणी आपल्याला सगळ्यांना बघायला मिळालेल्या आहेत.

मला स्वत:ला या देशातल्या शेतकरी वर्गावर माझा भयंकर भरोसा आहे. तो काय तरी करू शकतो. तो लोकांना जगवू शकतो. हल्ली राज्यकर्त्यांच्यामध्ये विचारधारा थोडी वेगळी आहे. मध्यंतरी पार्लमेंटच्यामध्ये एक अशीच पार्लमेंटच्या



**अतुल जैन हे मंत्री गुलाबराव पाटील यां चे सुती हार घालून स्वागत करताना .**

सदस्यांची आणि देशाच्या राज्य चालविण्याच्यासंबंधीची महत्त्वाची जबाबदारी असलेल्यांची संयुक्त चर्चा झाली आणि सगळ्यांची मतं ऐकल्याच्यानंतर त्यांनी मला माझी मतं विचारली. मी त्यांना सांगितलं, की या या क्षेत्रामध्ये मला कमतरता दिसते आणि शेती आणि शेती अर्थव्यवस्था सुधारायची असेल, तर पहिल्यांदा घाम गाळणाऱ्या शेतकऱ्याच्या मालाला उत्तम प्रकारची किंमत मिळाली पाहिजे, बाकी जोपर्यंत किंमत मिळत नाही, तोपर्यंत तुम्ही काही तत्वज्ञान सांगितलं, तरी त्या तत्वज्ञानाला काही अर्थ राहात नाही.

मला सत्ताधारी पक्षातल्या एका अतिशय उच्च श्रेणीच्या व्यक्तीनं सांगितलं, की पवार साहब आप के सोच में और मेरे सोच में फरक है. मी म्हटलं, क्या फरक हैं. ते म्हणाले, की आप हमेशा पैदा करने वाले की बात सोचते हैं. हिंदुस्थानमध्ये खानेवाले लोक जादा है, उनके बारे में सोचते नहीये. मी म्हटलं, खरं आहे तुमचं. हिंदुस्थानमध्ये खाणारे लोक जास्त आहेत. पण या खाणाऱ्या लोकांची भुकेची समस्या सोडविण्याची ताकद पैदा करणाऱ्या शेतकऱ्याच्यामध्ये आहे. आज तो शेतकरी उद्ध्वस्त झाला, तर आम्हाला खाणाऱ्याला याठिकाणी काही देता येणार नाही.

मला आठवतंय, पन्नास वर्षाच्यापूर्वी महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये मी पहिल्यांदा निवडून गेलो. त्यावेळेला या राज्यामध्ये आणि देशामध्ये अन्नधान्याचा तुटवडा होता आणि म्हणून अमेरिकेवरून लाल मिलो याठिकाणी आणला जात असे आणि लाल भाकरी खायची परिस्थिती या देशातल्या नागरिकांच्यावर आली होती. ते जर दिवस यायचे नसतील, तर शेतकऱ्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शेतकऱ्याच्या हिताचा विचार करावा लागेल, तरच भुकेल्यांची भूक भागविण्यासंबंधीची ताकद निर्माण होईल.

पण त्यातल्या एका तज्ज्ञानी सांगितलं, की शेतीमालाच्या किंमती वाढल्या, तर देशामध्ये महागाई येते. मोठी गंमतीची गोष्ट



**अविनाश पाटोळे यांचा शरद पवार शाल घालून सत्कार करताना, शेजारी बबनराव लोणीकर, एकनाथ खडसे, पांडुरंग फुंडकर, चंद्रकांत पाटील, सौ. रश्मी पाटोळे, अशोक जैन व गिरीश महाजन**

आहे. शेतकऱ्यांनी काय पिकवलं त्याला रास्त किंमत मिळाली, की महागाई होते. खताच्या किंमती वाढल्या तर स्वस्ताई होते. शेतकऱ्याला लागणाऱ्या गोष्टीची खरेदी करायची स्थिती आली, ती त्याला परवडत नसली तर कुणाला महागाई दिसत नाही. आणि म्हणून हा विचार करण्याची जी पद्धत आहे, माझ्या मते याच्यामध्ये कुठेतरी बदल करण्याची गरज आहे.

मला आठवतंय, की मी एकदा शेतीखात्याचं काम बघत असताना पार्लमेंटमध्ये चर्चा झाली. दिल्लीमध्ये कांद्याचे भाव फार वाढलेत. दिल्ली मोठं गंमतीचं गाव आहे. स्वत: काय पिकवत नाहीत. सगळ्या देशातलं खात असतात आणि ते खात असताना सगळं स्वस्तात मिळालं पाहिजे, याचा विचार करणाऱ्यांचं ते गाव आहे. आणि मी सभागृहामध्ये आलो तर आमचे काही खासदार अशा गळ्यामध्ये कांद्याच्या माळा घालून आलेले. मी म्हटलं, क्या हो गया. आज आप प्याज पहन के क्यों आये हैं. नाही म्हटले, आप के राज में प्याज की किंमत बहोत उपर गयी हैं आणि जोपर्यंत या किंमती खाली येत नाहीत, तोपर्यंत तुम्ही काही बोलायचं नाही आणि तुम्हाला बोलायचा अधिकार नाही. या किंमती खाली आणा. मी माझ्या भाषणात सांगितलं, की दोन गोष्टींचं उत्तर द्या, तुमच्या दैनंदिन खाद्यामध्ये, स्वयंपाकामध्ये, अन्नामध्ये कांद्याचा खर्च किती आहे? तुम्ही एक वेळेला जेवायला ताटात बसला, तर त्याच्या एकंदर जे काय भात असेल, भाकरी असेल, चपाती असेल, एखादी भाजी असेल, नॉनव्हेज खाणारा असेल तर अंडे असेल, किंवा आणखीन काय असेल, त्या सगळ्याला लागणारा खर्च आणि त्याच्यात कांदा याचा खर्च किती असेल? कुणी बोललं नाही.

मी स्वच्छ सांगितलं, की कांदा हे पीक जिरायत शेतकऱ्याचं पीक आहे. आज नाशिक जिल्ह्यातला जिरायत शेतकरी कांदा पिकवतो आणि कधी नाय ते त्याला दोन पैसे मिळाल्याच्यानंतर तुम्ही कांद्याच्या माळा गळ्यात घालून सभागृहामध्ये येता. तुम्ही सकाळ-संध्याकाळ कुठं जाताना कांदा घालून मिरवलात तरी त्याचे भाव खाली आले पाहिजेत, हे मी म्हणणार नाही. त्या शेतकऱ्यांना भाव मिळू द्या, त्याला जगायच्यासंबंधीची संधी त्याठिकाणी द्या. दंगा झाला, पण असल्या दंग्याची चिंता आम्ही कुणी करत नसतो. आणि त्याचं महत्त्वाचं कारण की शेतकऱ्याला रास्त किंमत मिळाली पाहिजे.

अनेक गोष्टी आज आपल्या सगळ्यांच्या समोर येत आहेत. नवीन तंत्र, विज्ञान याच्याशी शेतीचा सुसंवाद असला पाहिजे. हल्ली लोक विचार करायला लागलेत, की तुम्ही ही जी आधुनिकता शेतीमध्ये आणत आहात, हायब्रीड आणा म्हणता, नवीन गायी तयार करायच्या म्हणता, नवीन जीन तयार करायचं म्हणता, हे काय खरं नाही म्हणे. मी म्हटलं, काय खरं आहे. ते



**अतुल जैन हे सुरेश जैन यांचे सुती हार घालू न स्वागत करताना.**

म्हणाले, आपलं जुनं ते खरं आहे. म्हणाले, की दूध कमी दिलं तरी चालेल पण जुनीच गाय पाहिजे. उत्पादन कसंही आलं तरी चालेल पण जुनं बियाणं पाहिजे. या पद्धतीनं जुनं ते सोनं या नावानं आधुनिकतेपासून शेतकरी वर्गाला बाजूला न्यायचा विचार जे कुणी सांगत असतील तर या देशाच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला एकप्रकारे धक्का देणारं आहे आणि म्हणून ही परिस्थिती आपल्याला सहन होणारी नाही. म्हणून आधुनिकता पाहिजे. नवीन जाती पाहिजेत. नवीन तंत्र पाहिजे.

मी आत्ता आजच जैन बंधूंना सांगितलं, की याठिकाणचा कार्यक्रम तुम्ही करता, उत्तम कार्यक्रम आहे. पण इथं महाराष्ट्रातच नाही तर देशातला कुठलाही शेतकरी आल्याच्यानंतर त्या शेतकऱ्यांना नवीन तंत्र शेतीच्या क्षेत्रामध्ये आणण्याच्यासंबंधीचं आणि नवीन संशोधन करण्याच्यासंबंधीचं जे काम तुम्ही याठिकाणी केलेलं आहे, त्याचं दर्शन त्या समस्त शेतकऱ्यांना घडवा, त्यांच्या नव्या पिढीला दाखवा, हे बदल होतायंत आणि तो बदल त्याच्या शिवारामध्ये दिसला तर त्याचा संसार बदलल्याशिवाय राहाणार नाही आणि त्या कामाला आपल्याला प्रोत्साहित करायचंय. आज खऱ्या अर्थानं त्याची आवश्यकता आहे.

शेतकरी हा काय साधा असत नाही. लोक समजतात, की हा अडाणी आहे. त्याच्यासारखा भारी माणूस कुणी नाहीये. तो काय अडाणी-बिडाणी नाहीये. मला आठवतंय, महाराष्ट्रामध्ये एक मुख्यमंत्री होते वसंतराव नाईक आणि वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना मी त्यांच्या मंत्रिमंडळात राज्यमंत्री होतो. अगदी सुरूवातीला ७२ सालची गोष्ट आहे. त्यावेळेला कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र यांचं पाण्यावरून भांडण चाललेलं आणि नाईक साहेबांनी दिल्लीला जाऊन भाषण केलं, की महाराष्ट्रातल्या शेतीची सगळ्यात मोठी गरज कुठली असेल तर पाणी आणि म्हणून पाणी याला आमचं भयंकर महत्त्व आहे. आमचा शेतकरी पाण्यासाठी काय वाट्टेल ते करेल, कुठूनही पाणी आणेल, पण पाण्याला तो महत्त्व देतो. त्यावेळी केंद्रामध्ये डॉ. के. एल. राव नावाचे मंत्री होते, त्यांच्याकडे आज गिरीश महाजन बघतात ते पाटबंधारे खातं होतं.

नाईक साहेबांनी मला बोलवलं, की पाटबंधारे खात्याची जबाबदारी असलेले मंत्री डॉ. के. एल. राव महाराष्ट्रात येतायंत. त्यांना तू कोल्हापुरला घेऊन जा. मी म्हटलं, की कशासाठी? नाही म्हटले, की कोल्हापुरच्या शेतकऱ्यांनी पंचगंगा नदीतून वीस-वीस किलोमीटर पाणी आणलं आणि आपलं शिवार बागायत केलं ते त्यांना दाखवा. मी ठीक आहे म्हटलं. मी चौकशी केली,




कोल्हापुरच्या जवळ एक चंबुखडी नावाचा भाग आहे. असा डोंगर आहे आणि तिथं लोकांनी ऊस लावला होता. मी एकदा बघितला होता. तर ते राव आले आणि त्यांना घेऊन मी चंबुखडीला गेलो. असाच उन्हाळ्याचा महिना होता. दुपारचे बारा वाजले होते. ते राव म्हणजे जुने इंजिनिअर होते. आपण टोपी घालतो, पण त्यांची ती हॅट असायची. साहेबाची हॅट असते ना जुन्या काळातली तशी ती हॅट होती. त्यांनी बघितलं, की तिथले शेतकरी जमले. राव साहेबांनी बघितलं, की जमीन अशी होती, की काळी माती नाही. काही नाही. मुरमाड. लोकांनी मुरूम खणून काढले, माती बाहेरून आणली, पाणी २५ किलोमीटरवरून आणलं आणि तिथं उसाचं पीक लावलं. ते राव भयंकर आश्चर्यचकित झाले. म्हणाले, की तुमचा शेतकरी भयंकर आहे. दगडा धोंड्यात सुद्धा पाणी असेल तर ऊस लावतो. हे कसं काय? आणि त्यांनी डोक्याची टोपी काढली. त्यांच्या डोक्यावर टक्कल होतं, केस नव्हते आणि उन्हामुळं घाम यायला लागला. त्यांनी प्रश्न विचारला तिथल्या शेतकऱ्याला, की या माळावर दगडाधोंड्यात तुम्ही ऊस कसा लावता? तेव्हा शेतकऱ्यानी सांगितलं, तो मराठीत बोलत होता आणि मी भाषांतर





करून रावसाहेबांना सांगत होतो. त्या शेतकऱ्यानी सांगितलं, की साहेबाला सांगा की डोस्क्यावर टोपी घाला. कारण आम्हाला मोकळं वावर दिसतंय आणि घामाचं पाणी दिसतंय. मोकळं वावार दिसलं आणि पाणी दिसलं की आम्ही कांडं लावतो. त्यामुळं आम्ही तुमच्या डोस्क्यावरसुद्धा कांडं लावल्याशिवाय राहाणार नाही. पाणी दिसलं पाहिजे. आणि हा शेतकरी सहजपणानं बोलून गेला, पण पाण्याचं महत्त्व काय यासंबंधीची भावना त्यानी एका वाक्यात त्याठिकाणी सांगितली आणि केंद्र सरकारच्या मंत्र्याच्या लक्षात आलं, की महाराष्ट्रातला शेतकरी थेंब ना थेंब पाण्याच्यासाठी काय वाट्टेल ते कष्ट करायला तयार आहे, पैसे गुंतवायला तयार आहे. आणि त्यामुळं त्या सगळ्या गोष्टीला महत्त्व दिलं पाहिजे.

मला आनंद आहे, की भवरलालनी याच कामासाठी स्वत:चं जीवन वाहून घेतलं. त्या पाण्याचं महत्त्व सांगितलं. त्या पाण्याचं तंत्र त्यांनी सगळ्या जगातनं प्राप्त केलं आणि ते तुमच्या शिवारापर्यंत पोहोचवून तुमच्या शेताची उत्पादकता ही वाढवण्याच्या संबंधीची खबरदारी घेतली आणि त्याचाच परिणाम आज विविध क्षेत्रातली शेती उत्पादकता वाढण्याच्यासाठी आपण यशस्वी होतोय, आणि मला आनंद आहे, आज तेच काम करणाऱ्या अप्पासाहेबांबद्दलचा पुरस्कार आणि त्या विचारानं काम करणाऱ्या नव्या पिढीतल्या शेतकऱ्यांचा सन्मान हा अतिशय उत्तम प्रकारचा उपक्रम आहे आणि त्या उपक्रमाच्या संदर्भात मी जैन परिवाराला, त्या कुटुंबातल्या सगळ्या सहकाऱ्यांना, त्यांच्या कुटुंबीयांना, त्यांच्या अधिकाऱ्यांना, त्यांच्या तंत्रज्ञानाला, त्यांच्यासाठी काम करणाऱ्या शास्त्रज्ञांना सगळ्यांना धन्यवाद देतो. याच पद्धतीनं तुम्ही अखंडपणानं काम करत राहा. या देशातला बळिराजा आज आत्महत्येच्या रस्त्याकडे चाललेला आहे. त्याच्यातून त्याला बाहेर काढून स्वाभिमानानं उभं राहण्याची परिस्थिती सगळेजण मिळून निर्माण करण्याची खबरदारी याठिकाणी आधुनिक तंत्राच्या माध्यमातून घ्यावी. ते तुमचे प्रयत्न महाराष्ट्राच्या आणि देशाच्या दृष्टिनं उपयुक्त राहतील याबद्दलचा विश्वास याठिकाणी बाळगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



# शेतकऱ्यांना मोठा फायदा जैन इरिगेशनच्या उपक्रमाचा

## अनिल जैन यांचे उद्‌गार

आज आपण इथे अविनाश पाटोळेजी हे जे नाशिकचे शेतकरी आहेत, त्यांच्या सत्कारासाठी एकत्र आलो आहोत. आपल्याला कल्पना आहे, की जैन इरिगेशन आपली कंपनी ही शेतकऱ्यांनी बनवलेली, शेतकऱ्यांसाठी बनवलेली एक कंपनी आहे आणि १९६३पासून अव्याहतपणे शेतकरी, शेती आणि शेतकऱ्याचा कसा मान वाढेल, प्रतिष्ठा वाढेल, शेतकऱ्याचं उत्पन्न कसं वाढेल या विषयावरती काम करणारी आपली कंपनी जैन इरिगेशन आहे आणि भाऊंनी जेव्हा ड्रीप इरिगेशनची सुरूवात केली १९८८ला आणि जेव्हा एक पायनेरिंग असं काम केलं त्यावेळी माझ्या वडिलांना, भवरलालना भाऊंना प्रेरणा कै. अप्पासाहेबांनी दिली होती आणि म्हणून भाऊंनी जेव्हा शेतकऱ्यांना पुरस्कार द्यायचं ठरवलं तेव्हा हे ठरवलं, की आपल्याला ज्या व्यक्तीकडून प्रेरणा मिळाली, कै. अप्पासाहेब पवारांकडून त्यांच्याच नावानं आपण हा पुरस्कार ठेवावा आणि गेली कित्येक वर्षे हा पुरस्कार आपण देतोय.

या पुरस्कारामध्ये आपण नेहमीच अशा शेतकऱ्याची निवड करतो, की जो शेतकरी एक तंत्रज्ञान आत्मसात करून पुढे जातोय आणि नुसता स्वत:साठीच पुढे जात नाही, पण जो शेतकरी दुसऱ्या शेतकऱ्यांना प्रेरणा देऊ शकतो ही या पुरस्कारामागची एक भूमिका आहे. याच्यामध्ये आपण एक मेरिट जे म्हणतात, असा निकषाचा कस लावतो. आपले दापोली कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक निवड समिती आहे. ती प्रत्येक विभागामध्ये चांगलं काम करणाऱ्या शेतकऱ्यांची एक शॉर्टलिस्ट करतात, त्यांची नावं मागवतात, आणि ते जी शॉर्टलिस्ट केलेले शेतकरी होते, जसं यावेळी २०१६च्या वेळी अकरा शेतकरी होते आणि त्या प्रत्येक शेतकऱ्याला भेटून, त्यांच्याबद्दलची माहिती घेऊन, त्यांनी केलेल्या कार्याबद्दलची माहिती घेऊन आपण त्यांना एक गुण देतो आणि त्याच्यानंतर परत तीन शेतकऱ्यांची शॉर्टलिस्ट तयार केली जाते, आणि त्या तीन शेतकऱ्यांमध्ये जो शेतकरी सर्वोत्कृष्ट आहे, एक वेगवेगळ्या कारणांसाठी त्याची आपण निवड करतो आणि २०१६साठी अविनाश मनोहर पाटोळे यांची निवड झाली.

पाटोळे हे चांदवडला असतात नाशिक जिल्ह्यामध्ये आणि २००६पासून त्यांनी शेतीमध्ये काम केलंय. मित्रहो, हे आधी सॉफ्टवेअर इंजिनिअर होते. अमेरिकेत राहिलेले आहेत आणि अमेरिकेहून परत येऊन म्हणजे घरवापसी करून त्यांनी शेतीमध्ये एवढं नाव कमावलं, पैसा कमावला आणि चांगलं तंत्रज्ञान आत्मसात करून शेती पुढे कशी नेता येईल, शेतीचं काम पुढं कसं करता येईल याचा एक चांगला आदर्श पाटोळे यांनी इथे मांडलेला आहे. मित्रहो, आपल्याला कल्पना आहे, की गेली दोन ते तीन वर्षे शेतकऱ्यांना आणि शेतीविषयक गोष्टींना पर्यावरण बदल म्हणा किंवा आपल्या इकॉनॉमीमध्ये जे काय बदल घडतायंत, त्याच्यामुळे शेतकऱ्यांना बराचसा त्रास झालेला आहे. एक आपली ग्रामीण आर्थिक व्यवस्था जी होती, त्याच्यात बरचसं नैराश्य आलंय. त्यावेळी शेतकऱ्यांसाठी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून जर आपण शेती एक धंदा म्हणून बघितला, शेती एक व्यवसाय म्हणून बघितला, आणि शेतीमध्ये उत्पादकता वाढ आणि मूल्यवृद्धी करण्यावरही भर दिला तर काय चमत्कार घडू शकतो हे एक चांगलं उदाहरण पाटोळे साहेबांनी ठेवलंय.

आपली कंपनी जैन इरिगेशन याच्यासाठी बरेचशे नवीन



तंत्रज्ञान, नवीन नवीन उपक्रम राबवत असते. आज हा कार्यक्रम झाल्यानंतर आपला एक मसाले प्रक्रिया जो नवीन आपण एक कारखाना लावलेला आहे त्याचे उद्घाटन आदरणीय पवार साहेबांच्या हस्ते होईल आणि आता या परिसरामधले म्हणजे जळगावपासून जवळजवळ पाचशे ते सहाशे किलोमीटर क्षेत्रामधल्या शेतकऱ्यांना एक नवीन संधी येतेय, की आपलं आलं म्हणा, हळद म्हणा, मिरची म्हणा अशी वेगवेगळी पिकं

## मसाल्याचा अद्ययावत प्रकल्प

**जैन इरिगेशनने नव्याने उभारलेल्या मसाला फॅक्टरीतून दरवर्षी २४ हजार टन मसाले तयार होणार आहे. यात आले, हळद, मिरची, धना, जिरे व काळ्या मिरीचा समावेश असून हा सर्व माल शेतकऱ्यांकडून ताज्या स्वरुपात विकत घेऊन त्यावर निर्जलीकरणाची प्रक्रिया करून मग त्यापासून हे मसाले बनविण्यात येणार आहेत. पेस्ट, पावडर आणि छोटे छोटे तुकडे अशा तीन प्रकारात हे मसाले तयार होऊन २५ किलो चे पॅकिंग बनणार आहे. आत्तापर्यंत मसाल्याचे सहा कंटेनर युरोपात निर्यात करण्यात आले असून यापुढील काळात देशातही हे मसाले विकले जाणार आहेत. आशिया खंडातला हा मसाल्याचा सर्वात मोठा व अद्ययावत असा प्रकल्प आहे.**

ज्याच्यामध्ये मूल्यवृद्धी जास्त आहे किंवा आपली मिळकत जास्त आहे, असे पीक आता आपण करार शेती करून आपल्या कंपनीला देऊ शकाल आणि याच्या हिशोबाने एक नवीन काम आपण सुरू करतोय. ज्याच्यामुळे आपला आणि या पाचशे किलोमीटर क्षेत्रातल्या शेतकऱ्यांचा फायदा होईल आणि एक नवीन मिळकत मिळण्याचा कार्यक्रम अजून एक सुरू होईल.

आपण आज एवढ्या मोठ्या संख्येनं इथं हजर झालात, बाहेर चाळीस डिग्रीचं ऊन आहे. असं असतानाही आपण आमचं आमंत्रण स्वीकारून इथे आलात, आवर्जून आपण उपस्थित राहिलात, याच्याबद्दल आपले जेवढे आभार मानावेत तितके कमी आहेत. आपण शेतकरी म्हणून जेवढं काम करतांय, आपण आपल्या शेतामध्ये जी मेहनत घेतांय, त्याच्यासाठी आपले आभार मानायलाच हवेत. कारण आपल्याशिवाय भारत देश जगू शकत नाही, आपल्याशिवाय दुनिया जगू शकत नाही आणि त्याच्यासाठी आपण सर्व शेतकऱ्यांचे नक्कीच आभार मानले पाहिजेत. मी कार्यक्रमासाठी आलेल्या मंचावरील सर्व पाहुण्यांचे आभार मानतो, की त्यांचे जे काय कार्यक्रम होते त्याच्यातून वेळात वेळ काढून आपण सर्व इथे आलात त्याच्याबद्दल आपलेही आभार मानतो.

पण शेवटी सर्वात महत्त्वाचा विषय शेतकऱ्यांचाच आहे आणि आज आपण आत्ता शेती आणि शेतकऱ्यासाठी पुढच्या कालावधीत त्यांनी काय करावं याच्याबद्दल आपण मान्यवरांकडून मार्गदर्शन ऐकूया आणि आपण आज आलात त्याच्याबद्दल परत आपले आभार मानून मी माझे प्रास्ताविक संपवतो.

Post Regn. No. : MCS/208/2017-19
Published on 15th of every month, posted on 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001.
RNI No. : MAHMAR / 2008 / 39849



# जैन टिश्यूकल्चर भगवा डाळिंब रोपे



## देशात गेल्या १० वर्षात ९७ हजार एकरांवर जैन टिश्युकल्चर डाळिंबाची लागवड

### जानेवारी २०१८ पासून पुढील लागवडीसाठी बुकिंग सुरू झाले.

- जैन इरिगेशन १० वर्षांपासून डाळींब टिश्युकल्चर रोपांची निर्मिती करीत आहे.
- झाडातील तंतु पेशीपासून रोपांची निर्मिती त्यामुळे १०० टक्के* तेल्या व मर मुक्त रोपे फक्त जैन टिश्युकल्चर मुळेच शक्य.
- झाडाच्या खोडापासून तर शेंड्यापर्यंत फळ धारणा.
- तेल्या व मर रोगांच्या प्रसारास आळा घालणारे एकमेव शास्त्र म्हणजे जैन तंत्रज्ञान व जैन डाळींब रोपे.
- आकर्षक रंगाची, मोठी, वजनदार व जाड सालीची डाळींब फळे.
- निर्यातीसाठी टिश्यूकल्चर डाळिंब फळांना विशेष मागणी.
- गुटी लागवडीच्या बागेप्रमाणे फळ धारणेसाठी दोन वर्षे प्रतिक्षा करण्याची गरज नाही.
- **भूल थापांना नको थारा - जैन तंत्रज्ञानाची कास धरा.**



*अटी लागू

वाण- **भगवा रु. ३०/-**
प्रतीरोप-जागेवर
वाहतूक खर्च वेगळा

टिप - जैन टिश्यूकल्चर डाळींब रोपे रोगमुक्त असली तरी शेतात लागवड केल्यानंतर रोगाचा प्रादुर्भाव होवू शकतो. त्यामुळे रोगांच्या प्रादुर्भावाची व उत्पादनाची हमी कंपनी घेऊ शकत नाही.

**जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.**
*कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®*

**जैन टिश्यूकल्चर**
अधिक उत्पादन - अधिकाधिक नफा.

जैन प्लास्टीक पार्क, पो. बॉ. ७२, जळगांव-४२५००१.
फोन : ०२५७-२२५८०११, ई- मेल:jisl@jains.com;
वेबसाईट: www.jains.com.
**बुकींगसाठी संपर्क : ०२५७-६६००८३५ ,२२५८०१७**
**टोल फ्री: १८०० ५९९ १०००**